

Discovering Zero Foundation

eklavya

parag
AN INITIATIVE OF
TATA TRUSTS

बिंब
प्रतिबिंब

बालसाहित्यामधील उदयोन्मुख आणि इच्छुक भाषांतरकारांसाठी अनुभव कार्यशाळा

(इंग्रजी आणि हिंदी मधून मराठी भाषांतर)

अर्ज आवाहन!

बिंब
प्रतिबिंब
२०२५-२६

आशय

03 परिचय
04 कार्यशाळेची उद्दिष्टे
05 कार्यशाळेचे तपशील
06 प्रकिया आणि काही महत्वाच्या तारखा
07 मुख्य अभ्यासघटक
08 मार्गदर्शक
11 संयोजक टीम

भारतातील बालसाहित्याची सद्यपरिस्थिती

भारत भाषिकदृष्ट्या खूप समृद्ध असला तरी, भारतीय भाषांतील बालसाहित्य हे प्रकाशन क्षेत्रातील सर्वात दुर्लक्षित क्षेत्रांपैकी एक आहे. भारतातील २२ अनुसूचित भाषांसह अस्तित्वात असलेल्या इतर शेकडो भाषांमध्ये अपवाद वगळता मुलांसाठी दर्जेदार पुस्तकं खूप कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. मुख्य प्रवाहातील प्रकाशनव्यवस्थेचा भर हा अजूनही मुख्यत्वे इंग्रजी आणि हिंदी साहित्यनिर्मिती करण्याकडे असल्यामुळे मोठ्या संख्येने मुले मातृभाषेत सकस साहित्य वाचण्यापासून वंचित आहेत. संज्ञानात्मक विकास आणि सांस्कृतिक मुळं सुदृढ करण्याच्या प्रक्रियेतील एक महत्वाचा दुवा म्हणून बहुभाषिकतेला राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० प्रोत्साहन देते. शाळेतील शिक्षण आणि घर-परिसर यामधील संबंध सशक्त व्हावेत म्हणून स्थानिक भाषांमध्ये उत्कृष्ट दर्जाची शैक्षणिक सामग्री तयार करण्यासाठी शाळा आणि शिक्षकांना या धोरणाच्या माध्यमातून प्रोत्साहन देण्यात आले आहे.

मातृभाषेतील सकस शैक्षणिक साहित्याच्या अभावाचा मुलांच्या विकासावर गंभीर परिणाम होतो. भाषा ही फक्त संवादाचे माध्यम नसते, तर ती संस्कृती आणि स्मृतींची वाहकही असते. जेव्हा मुलांना त्यांच्या मातृभाषेत पुस्तके उपलब्ध होत नाहीत, तेव्हा त्यांच्या भावविश्वाचे, त्यांच्या मूल्यांचे आणि दररोजच्या अनुभवांचे मातृभाषेत शब्दांकित झालेले प्रतिबिंब पारखण्याची संधी ते गमावतात.

बिंब प्रतिबिंब

प्रादेशिक भाषांमध्ये दर्जेदार बालसाहित्य उपलब्ध होईल याची तजवीज करणारा बिंब प्रतिबिंब हा एक अनोखा प्रयत्न आहे. मुख्यत्वे उदयोन्मुख भाषांतरकारांसाठी आखण्यात आलेल्या कार्यशाळेत उदयोन्मुख भाषांतरकार आणि प्रकाशक यांना एकत्र आणून लहानग्या वाचकांसाठी भारतीय भाषांमध्ये वैविध्यपूर्ण भाषांतरित पुस्तकं तयार करणं, हा कार्यशाळेचा उद्देश आहे. ह्या कार्यशाळेची संकल्पना टाटा ट्रस्टचा एक उपक्रम असलेल्या ‘पराग’ची आहे. ‘बिंब-प्रतिबिंब’ अंतर्गत पहिलीवाहिली कार्यशाळा कन्नड भाषेत अनुवादित साहित्यनिर्मितीसाठी २०२४ मध्ये संपन्न झाली. ‘बहुरूपी प्रकाशना’च्या साह्याने जानेवारी २०२४ मध्ये बंगळुरूला आयोजित करण्यात करण्यात आलेल्या कार्यशाळेतून ११ दर्जेदार अनुवादित पुस्तकं कन्नड भाषेत प्रकाशित करण्यात आली.

यंदा बिंब-प्रतिबिंब २०२५-२६ कार्यशाळेच्या माध्यमातून मराठी भाषेत अनुवादित बालसाहित्यनिर्मितीला प्राधान्य देण्यात येणार आहे. ही कार्यशाळा ‘पराग’, ‘कुल्फी’ नियतकालिक, आणि एकलव्य फाउंडेशन यांच्या सहकार्याने संपन्न होईल.

कार्यशाळेची उद्दिष्टे

- समकालीन मराठी बालसाहित्यात अनुवादित लेखणामध्ये योगदान देऊ शकतील अशा भाषांतरकारांच्या समुदायाची निर्मिती करणे आणि त्याला बळकटी देणे.
- समकालीन बालसाहित्याची ओळख (विविध साहित्यप्रकार, लेखनशैली आणि विषय) भाषांतरकारांना करून देणे, तसंच छोट्या वयोगटातील मुलांसाठी आणि किशोर/कुमार वाचकांसाठी भाषांतर करताना अंगीकारायची तत्त्वं, पाळायची पथ्यं आणि अनुवादाच्या पद्धती यांची ओळख करून देणे.
- विविध साहित्यप्रकार, लेखनशैली आणि विषयांमधील बालसाहित्य भाषांतरित करण्याचा प्रत्यक्ष अनुभव कार्यशाळेदरम्यान सहभागी सदस्यांना देणे; सोबत, कार्यशाळेनंतर विस्तारित मार्गदर्शन कालावधीत (Extended Mentorship Period) प्रकाशित करण्यायोग्य, दर्जेदार असे अनुवादित बालसाहित्याचे खर्डे विकसित करणे.



कार्यशाळेचे तपशील

कालावधी

७ आठवडे (यामध्ये ३.५ दिवसांची निवासी कार्यशाळा आणि तज्ज्ञांच्या दूरस्थ: मार्गदर्शनासह स्वतंत्रपणे भाषांतर करण्याचा ६ आठवड्यांचा कालावधी समाविष्ट आहे)

लक्षित गट

इंग्रजी आणि हिंदीमधील बालसाहित्य मराठीत भाषांतर करण्यासाठी मराठी बालसाहित्यातले उदयोन्मुख आणि इच्छुक भाषांतरकार यांच्यासाठी ही कार्यशाळा असेल

कार्यशाळेची भाषा

मराठी, हिंदी आणि इंग्रजी

सहभागींकडून अपेक्षा

- २३ ते २६ जानेवारी २०२६ या कालावधीत पुण्यात किंवा पुण्याच्या आसपास होणाऱ्या निवासी कार्यशाळेत पूर्णवेळ सक्रिय सहभागी होणे.
- प्रत्यक्ष कार्यशाळेनंतर तज्ज्ञांच्या साह्याने ६ आठवड्यांच्या (फेब्रुवारी-मार्च २०२६) दूरस्थ: भाषांतर प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेणे आणि निवडलेल्या संहितेवर काम करणे.

शुल्क

ही कार्यशाळा नि:शुल्क आहे. मात्र, सहभागींना पुण्यापर्यंत ये-जा करण्याचा प्रवासखर्च स्वत: करावा लागेल.

अर्हता

- वय किमान १८ वर्षं किंवा त्याहून अधिक असावे.
- इंग्रजी/हिंदीत बोलणं, वाचन आणि लेखन चांगल्या प्रकारे करता यावे.
- मराठीत लेखन आणि भाषांतर करण्यासाठी भाषेवर उत्तम पकड असावी.
- २३–२६ जानेवारी २०२६ दरम्यान ३.५ दिवसांच्या निवासी कार्यशाळेत पूर्णवेळ उपस्थित राहायची हमी देणे.
- ६ आठवड्यांच्या दूरस्थ: मार्गदर्शन प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेऊन निवडलेल्या संहितेवर काम करून ती पूर्ण करण्याची तयारी असणे.

अर्जांची तपासणी व निवडचाळणीनंतर कमाल १५ सहभागी या कार्यशाळेसाठी निवडले जातील.

कार्यशाळेतील साहाय्याचे स्वरूप

- **मार्गदर्शन:** प्रत्यक्ष कार्यशाळा आणि कार्यशाळेनंतर ६ आठवड्यांच्या कालावधीत तज्ज्ञ मार्गदर्शकांचं साहाय्य मिळेल. यात साप्ताहिक कॉल्स, चर्चासत्रं आणि भाषांतराच्या प्रगतीचा नियमित आढावा यांचा समावेश असेल.
- **संसाधने:** संदर्भ वाचनासाठी इंग्रजी आणि मराठीतील पूरक साहित्याचा संच उपलब्ध करून दिला जाईल.
- **भोजन आणि निवास:** सहभागी व्यक्तीसाठी ३.५ दिवसांच्या निवासी कार्यशाळेदरम्यान आवश्यक व्यवस्थांचा खर्च आयोजक करतील.
- **प्रवास:** पुण्यापर्यंत येण्या–जाण्याचा खर्च सहभागी सदस्यांनी करायचा आहे.

निष्पत्ती

कार्यशाळा आणि मार्गदर्शन प्रक्रियेद्वारे दर्जेदार, प्रकाशनयोग्य भाषांतरित संहितांची निर्मिती होईल.



अर्ज आणि निवड प्रक्रिया

- अर्ज करण्यासाठी सहभागींना ऑनलाईन अर्ज भरायचा आहे. त्या अर्जामध्ये अनुवाद करण्यासाठी काही असाइनमेंट्स (नमूना संहिता) दिल्या आहेत. त्या असाइनमेंट्ससह संपूर्ण अर्ज अंतिम मुदतीपूर्वी सादर करणं आवश्यक आहे.
- असाइनमेंट्सच्या तपशीलांसाठी [येथे क्लिक करा].
- सर्व अर्जं दोन टप्प्यातल्या निवडचाळणी प्रक्रियेतून जातील आणि यामध्ये नियोजित टेलिफोनिक मुलाखतसुद्धा असू शकते.
- अर्जाच्या निवडीबद्दलचा निर्णय सहभागींना ईमेलवरून २८ डिसेंबर २०२५ पर्यंत कळवला जाईल.

महत्त्वाच्या तारखा

३० नोव्हेंबर २०२५	अर्ज भरण्याची अखेरची तारीख
२८ डिसेंबर २०२५	निवडलेल्या सहभागींच्या नावांची घोषणा
२३–२६ जानेवारी २०२६	पुण्यात ३.५ दिवसांची निवासी कार्यशाळा
९ मार्च २०२६	अंतिम भाषांतरित संहिता सादर करण्याची शेवटची तारीख

अर्ज करा!

अर्ज करण्यासाठी ही लिंक वापरा

सूचना – अपूर्ण अर्ज स्वीकारण्यात येणार नाही.

काही प्रश्न असल्यास books@paragreads.in इथे लिहा.

मुख्य अभ्यासघटक

घटक १ बालपण आणि बालसाहित्य

बालपणाची संकल्पना आणि विविध काळानुरूप जागतिक आणि मराठी बालसाहित्यात ह्या संकल्पनेचे दिसणारे प्रतिनिधित्व यांचा परिचय या घटकामध्ये होईल. बालपणाबद्दलच्या कल्पनांचा कथाकथनावर आणि लहानग्या वाचकांसाठी रचण्यात आलेल्या भावविश्वावर कसा प्रभाव पडतो, यावर आपसात चर्चा आणि पूरक साहित्याच्या माध्यमातून चिंतन होईल.

घटक २ भाषांतराची मूलतत्त्वे

प्रत्यक्ष जीवनातील उदाहरणांवर आधारित या घटकामध्ये, भाषांतराच्या मूलभूत तत्त्वांवर लक्ष केंद्रित केले जाईल. नैसर्गिक, प्रवाही आणि आकर्षक भाषांतर व्हावं यासाठी मूळ मजकुराची लय, भाव आणि सच्चेपणा टिकवून ठेवण्याचं काम चांगलं भाषांतर कसं करते, याचा अभ्यास सहभागी सदस्य करतील.

घटक ३ प्रत्यक्ष अनुभव आणि मार्गदर्शन

ह्या व्यावहारिक घटकामध्ये, मार्गदर्शकांच्या साहाय्याने सहभागी व्यक्ती भाषांतर कौशल्यांवर काम करतील. काही स्वाध्यायादरम्यान तसेच सुचवण्यांमधून सहभागी सदस्यांना तज्ज्ञ व्यक्तींचं मार्गदर्शन मिळेल. प्रत्यक्ष कार्यशाळेदरम्यान आणि नंतरच्या मार्गदर्शन काळात सहभागी व्यक्ती त्यांची समज आणि आत्मविश्वास उदयोन्मुख भाषांतरकार म्हणून अधिक ठळकपणे विकसित करतील.

मार्गदर्शक

तुलतुल बिस्वास

तुलतुल या एकलव्य फाउंडेशनच्या संचालिका आहेत. याआधी, शिक्षक प्रशिक्षण, शिक्षण प्रसार आणि हक्क कार्यक्रमासाठी समन्वयक म्हणून कार्यरत असताना वर्गपातळीवर मुलांसाठी अर्थपूर्ण बदल घडावेत, यासाठी शिक्षकांसाठी आणि तळागाळातील कार्यकर्त्यांसाठी शिकण्याच्या संधी, कार्यशाळा आणि कृतीवर्ग यांची आखणी त्यांनी केली आहे. एकलव्य फाउंडेशनमध्ये, त्या मुलांसाठी, शिक्षकांसाठी आणि वाचकांसाठी पुस्तकनिर्मिती करणाऱ्या गटाचं नेतृत्व करत आहेत. स्वतंत्र, विचारप्रवण आणि स्वायत्त कथानक असणाऱ्या मुलांच्या कथा आणि शिक्षक व पालकांसाठीच्या प्रत्यक्ष अनुभवावर आधारित अशा शैक्षणिक साहित्यावर त्यांचा भर असतो. स्वत: हिंदी आणि इंग्रजीतून बांग्ला अनुवाद करण्यासोबत तुलतुल 'लायब्ररी एज्युकेटर्स कोर्स'सोबतही अनेक वर्षांपासून जोडलेल्या आहेत. ह्या कोर्समध्ये त्या 'बालपण आणि बालसाहित्यातील त्याचे प्रतिनिधित्व' या विषयावर मार्गदर्शन करतात.

डॉ. चिन्मय धारूरकर

चिन्मय हे IIT कानपूरच्या मानव्य आणि सामाजिक शास्त्र विभागातील साहाय्यक प्राध्यापक आहेत. बहुभाषाविद्, भाषांतरकार आणि भाषाशास्त्रात मूलभूत विचार मांडणारे म्हणून ते ओळखले जातात. अनेक भारतीय आणि परदेशी भाषांमध्ये ते प्रवीण आहेत. त्यांच्या संशोधनात, शिकवण्यात आणि भाषांतर प्रक्रियेत त्यांच्या समृद्ध भाषिक जाणीवांचं प्रतिबिंब उमटते.

त्यांनी भाषाशास्त्र, तत्त्वज्ञान आणि साहित्यातील तत्त्वज्ञानावर आधारित काही पायाभूत ग्रंथ (जसं की, सॉसूर, चॉम्स्की, बार्थेस, फूको, ओरहान पामुक इत्यादी) मराठीत अनुवाद केले आहेत. त्याचबरोबर, त्यांनी बरेच महत्त्वाचे मराठी साहित्य इंग्रजीत नेलं आहे आणि कित्येक उर्दू गझला इंग्रजीत भाषांतर केल्या आहेत. त्यांनी IIT मुंबईतून संस्कृत व भाषाशास्त्रात Ph.D. प्राप्त केली आहे आणि सोबत Excellence in Thesis Work Award मिळवला आहे. मराठी व इंग्रजीत दहा वर्षांच्या अध्यापन, संशोधन आणि सर्जनशील लेखन-अनुभवासह, डॉ.धारूरकर विद्यार्थ्यांना भाषा, संस्कृती आणि भाषांतर यांच्यातील संबंध अभ्यास करण्यासाठी प्रेरित करतात.

मेघना भुस्कुटे

मेघना भुस्कुटे या मराठी, हिंदी, इंग्रजी आणि जर्मन भाषेत भाषांतर करण्याचा दोन दशकाहून अधिक अनुभव असलेल्या व्यावसायिक भाषांतरकार आहेत. पेगी मोहनच्या Wanderers, Kings, Merchants या पुस्तकाच्या 'भारतीय भाषांची अनोखी कहाणी' या त्यांच्या अनुवादाला मराठी साहित्य परिषदेचा सर्वोत्कृष्ठ अनुवादाचा पुरस्कार मिळाला आहे. त्या भास प्रकाशन या प्रकाशनगृहाच्या संस्थापक आहेत. त्या 'भास' याच नावाच्या अनियतकालिकाचं संपादनही करतात. मेघना सिनेमा, साहित्य, रंगभूमी आणि भाषाशास्त्रावर विस्तृत लेखन व संपादन करतात. 'अजुनी या शहरात' हा त्यांचा काव्यसंग्रह शब्द पब्लिकेशन्सकडून प्रकाशित झाला आहे. 'नाही मानीयले बहुमता' ह्या नंदा खरे यांच्या लिखाणावर आधारित ग्रंथाचे सहसंपादन त्यांनी केले आहे. सध्या त्या बहुराष्ट्रीय IT कंपनीसाठी जर्मन भाषांतरकार म्हणून कार्यरत आहेत.

प्रा. माया पंडित

प्रा. माया पंडित, EFL युनिव्हर्सिटी, हैदराबादच्या माजी इंग्रजी प्राध्यापक, एक विख्यात भाषांतरकार, विदुषी आणि कार्यकर्त्या आहेत. इंग्रजी भाषा, साहित्य आणि भाषांतर क्षेत्रात चार दशकांहून अधिक अनुभव त्यांच्या गाठीशी आहे. स्थानिक आणि उपेक्षित आवाजांना व्यापक वाचक-प्रेक्षकांपर्यंत पोचवण्यात महत्त्वाची भूमिका त्यांनी भाषांतराच्या आणि शैक्षणिक कामातून पार पाडली आहे. त्यांच्या इंग्रजी भाषांतरात The Prisons We Broke (बेबी कांबळे), The Weave of My Life (उर्मिला पवार), The Nowhere People (जयंत पवार), महात्मा फुले यांचे Slavery, Thereafter (सानिया) आणि Ringaan: The Full Circle (कृष्णात खोत) यांचा समावेश आहे. मराठी भाषांतरात डारियो फोचे An Accidental Death of an Anarchist आणि रामू रामनाथनचे महादेवभाई यांचा समावेश आहे. साहित्य अकादमीसाठी Voices from the Margins या दलित महिला लेखकांवरील डॉक्युमेंटरीचे दिग्दर्शन त्यांनी केले आहे.

वसीमबार्री मणेर

बालसाहित्यात गती आणि रुचि असलेले वसीमबार्री हे ॲनिमेटर, चित्रपट दिग्दर्शक, शिक्षक आणि बालसाहित्यिक म्हणून गेल्या २२ वर्षांपासून कार्यरत आहेत. शेल सिल्व्हरस्टीन आणि रिचर्ड स्कॅरी यांसारख्या लेखकांचा प्रभाव असलेल्या वसीमबार्री यांच्या लिखाणात, सर्जनशीलता, शिक्षण आणि कथाकथन यांचा संगम दिसतो. त्यांनी टाटा ट्रस्ट्स, यूएसएआयडी आणि सेंटर फॉर मायक्रोफायनान्ससह विविध साक्षरता आणि ग्रंथालय संबंधी उपक्रम हाताळले आहेत. फलटणमधल्या १५० शाळांमध्ये राबवण्यात आलेला व्यापक पातळीवरील साक्षरता आणि वाचनालये कार्यक्रम आणि ग्रामीण भागात सहा बालसाहित्य वाचनालयांची निर्मिती यांचा त्यात समावेश आहे. सध्या ते FTII, पुणे येथे सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत असून ‘मुलांसाठी ऑडिओ-व्हिज्युअल सामग्री’ या विषयावर डॉक्टोरल संशोधन करत आहेत. लेखक व चित्रकार म्हणून त्यांनी आठ पुस्तके लिहिली आहेत, तर वीसहून अधिक पुस्तके चित्रित केली आहेत. त्यांच्या ‘मौजे पुस्तक संच१’ या पुस्तकाला राजा मंगळवेढेकर बालसाहित्य पुरस्कार (२०२०) मिळाला आहे.



संयोजक टीम

कुल्फी नियतकालिक

Discovering Zero Foundation

‘कुल्फी’ हे ९ ते १५ वर्षे वयोगटातील मुलांसाठी सर्जनशील आणि समकालीन मराठी बालसाहित्याची निर्मिती करण्यासाठी २०२२ साली सुरू झालेले त्रैमासिक आहे. ‘डिस्कव्हरिंग झिरो फाउंडेशन’, या सेक्शन ८ नॉन-प्रॉफिट कंपनीमार्फत कुल्फीची निर्मिती होते. कसदार बालसाहित्य निर्मिती, वाचनालयांची जडणघडण आणि त्यासाठी कार्यरत असणाऱ्या विविध घटकांचे क्षमता संवर्धन याच्या माध्यमातून कृतिशील वाचनसंस्कृतीची जडणघडण करणे यासाठी ही संस्था वचनबद्ध आहे. ‘कुल्फीवाला आला’ ह्या नावीन्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून शाळांमध्ये कथाकथन, गाणी, चर्चा आणि प्रदर्शनाद्वारे बालसाहित्य पोहचवणे आणि त्याची गोडी मुलांमध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो.

एकलव्य फाउंडेशन

eklavya

एकलव्य फाउंडेशन ही भोपाळस्थित नोंदणीकृत नॉन-प्रॉफिट असलेली NGO, शिक्षण आणि प्रकाशन क्षेत्रात १९८२ पासून सक्रिय आहे. संस्थेच्या कामाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे, साक्षेपी, चिकित्सक आणि अनुभवाधारित अशा सर्वसमावेशक, सहभागी, अर्थपूर्ण आणि सांस्कृतिकदृष्ट्या संवेदनशील शिक्षणासाठी सरकारी यंत्रणा, शिक्षक आणि समुदाय’ यांच्यासोबत प्रत्यक्ष सहभागी होणे. आजवर एकलव्यने मुलांसाठी आणि शिक्षकांसाठी १५ पेक्षा जास्त अनुसूचित व बिगर-अनुसूचित भारतीय भाषांमध्ये ८०० पेक्षा जास्त पुस्तके प्रकाशित केली आहेत. मुख्यत: शाळा आणि समुदायाधारीत कार्यक्रमांच्या माध्यमातून एकलव्यची प्रकाशने आणि वितरण देशभरात लाखो वाचकांपर्यंत पोचलं आहे. लहानग्या वाचकांचे जीवन आणि त्यांच्या सभोवतालचे वातावरण प्रतिबिंबित करेल असे साहित्य, विशेषतः उपेक्षित आणि प्रतिनिधित्वाचा अभाव असलेल्या समुदायांतील मुलांसाठी भाषा सुलभ ठेवून आणि वाजवी दरात पुस्तकनिर्मिती होईल याकडे प्रकाशनाचा कटाक्ष असतो.



पराग - टाटा ट्रस्टचा उपक्रम

पराग हा टाटा ट्रस्टचा उपक्रम आहे. मुलांसाठी भारतीय भाषांमध्ये दर्जेदार कथा-पुस्तके निर्मिती आणि उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांना हातभार लावणे हा उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. मुलांना वाचनातून आनंद मिळवण्यासाठी पुस्तकं मोफत उपलब्ध व्हावीत, त्यासाठी खुल्या आणि सक्रिय वातावरणाची निर्मिती व्हावी, यासाठी शाळा आणि समुदायातील वाचनालयांना पराग साह्य करते. बालसाहित्य क्षेत्राच्या जडणघडणीसाठी पुरस्कार, व्यावसायिक अभ्यासक्रम तसेच शिक्षक, ग्रंथपाल, लेखक व मार्गदर्शक यांच्यासारख्या विविध घटकांना एकत्र आणण्यासाठी निरनिराळ्या कार्यक्रमांचे आयोजनही 'पराग' मार्फत केले जाते.

parag

AN INITIATIVE OF TATA TRUSTS

अधिक माहितीसाठी books@paragreads.in भेट देता येईल